# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम

सहकार हाईट (पाच मजली इमारत), पहिला मजला, महानगरपालिका बिल्डींग, डिवाईन चर्च जवळ,
मिनाताई ठाकरे मंडईच्या बाजूला, रामदेव पार्क, मिरा रोड (पू.) ४०१ १०७ ईमेल : dtomhmbd@rntcp.org

जा.क्र. मनपाराक्षदुका/३६९/2023-24

दि.२२ /११/2023.

**मिरा भाईंदर महानगरपिलका कार्यक्षेत्रात "कुष्ठरुग्ण शोध व सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिमेस" दि. 20/11/2023 ते 06/12/2023 पासून सुरवात**

राज्यातील सर्व जिल्हे व महानगरपालिका कार्यक्षेत्रात "कुष्ठरुग्ण शोध (LCDC) व सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिमेस (ACF)" दि. 20/11/2023 ते 06/12/2023 रोजी राबविण्याबाबत शासनाकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत. सदर मोहिमेमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जोखीमग्रस्त भागातील घरांचे सर्व्हेक्षण करण्यात येणार असून घरामधील सर्व सभासदांची कुष्ठरुग्णाबाबत शारीरिक तपासणी करण्यात येणार आहे व क्षयरोगाची लक्षणे असलेल्या संशयीत क्षयरुग्णांची तपासणी करण्यात येणार आहे. त्यानुसार कुष्ठरोगासाठी त्वचेवर फिकट / लालसर बधीर चटटा, त्याठिकाणी घाम न येणे, जाड बधिर तेलकट चकाकणारी त्वचा, त्वचेवर गाठी असणे, कानाच्या पाळया जाड होणे, तळ हातावर व तळ पायावर मुंग्या येणे, बधिरपणा अथवा जखमा असणे व क्षयरोगासाठी दोन आठवडयापेक्षा जास्त कालावधीचा खोकला, संध्याकाळी येणारा हलकासा ताप, वजनात लक्षणीय घट, थुंकीवाटे रक्त येणे, मानेवरील गाठ सदर लक्षणे असलेल्या एकुण लोकसंख्येच्या 30 टक्के जोखीमग्रस्त 3,39,592 लोकसंख्येच्या सर्व संशयीतांची तपासणी 162 प्रशिक्षीत आरोग्य पथकामार्फत होणार असून त्यामध्ये कुष्ठरोगासाठी अंदाजित 3360 संशयीत रुग्ण नोंदणी होणार आहे व त्यामधुन 23 रुग्णांचे निदान होणे अपेक्षित आहे व क्षयरोगासाठी अंदाजित 6791 संशयीत क्षयरुग्ण शोधणे अपेक्षित आहे व त्यामधून 339 क्षयरोगाचे निदान होणे अपेक्षित आहे.

सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सांसर्गीक व असांसर्गीक असे एकुण 32 रुग्ण औषधोपचार घेत असून गतवर्षी 24 कुष्ठरुग्ण रोग मुक्त झाले आहेत. तसेच क्षयरुग्णांचे 1900 रुग्ण औषधोपचार घेत असून गतवर्षी 2734 रुग्ण औषधोपचार घेत होते, त्यापैकी 2464 क्षयरुग्णांना बरे केले आहेत.

सदर मोहिम 14 दिवसाकरीता मिराभाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार आहे. मोहिमेत भाग घेणाऱ्या प्रत्येक सदस्याचे प्रशिक्षण वैद्यकीय अधिकारी नागरी आरोग्य केंद्र यांच्याकडून घेतले जाणार आहे. सदर मोहिम यशस्वीरित्या राबविण्याकामी व अपेक्षित उदिद्ष्ट पुर्ण करण्याकरीता वैद्यकीय अधिकारी यांना मार्गदर्शक शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बालनाथ चकोर, यांनी केले आहे.

सदर मोहिमेतंर्गत घरातील एकही सदस्य तपासणीपासून वंचित राहणार नाही व कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष सर्व्हेक्षणासाठी जाणाऱ्या आरोग्य पथकास सहकार्य करण्याबाबत मा. उपायुक्त (वै) श्री. संजय शिंदे व अति. आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे व मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर, यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जनतेस आवाहन करत आहेत.

(डॉ. बालनाथ चकोर)
शहर क्षयरोग अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका